# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती

कॅम्प, अमरावती

दुरध्वनी ☎ ०७२१-२६६२०३४/०७२१-२६६२९४७, फॅक्स-०७२१-२६६२७८२

---

क्र.आकाअ/मशा.४/प्र.क्र.-६११ /२०१७ दि.१२ मे, २०१७

वाचा : १) शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०२००० / प्र.क्र.१२७/ ई-९, दिनांक ०९ ऑक्टोंबर, २०००.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/ प्र.क्र.२८२/२०१२, दि.२१.१०.२०११.

## परिपत्रक

अमरावती विभागात दि.०१.०१.२०१६ रोजी कार्यरत असलेल्या अव्वल कारकून/ मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांची एकत्रित तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची विभागातील जिल्हाधिकारी यांचेस्तरावर अंतिम सेवा ज्येष्ठतासूचीनुसार विभागाची प्रारुप एकत्रित सेवा ज्येष्ठतासूची तयार करण्यात आली असून सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे, याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियम) नियम, १९८२ मधील तरतूदीनुसार तसेच यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या ज्येष्ठतासूची व निवडसूच्यांमधील माहितीच्या आधारे तयार करुन याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

संबंधीत जिल्हाधिकारी यांनी त्यांचे जिल्ह्यांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तसेच सर्व तहसील कार्यालयांमध्ये सदर प्रारुप एकत्रित सेवा ज्येष्ठतासूची प्रसिध्द करुन सर्व संबंधीत अव्वल कारकून व मंडळ अधिकारी यांचे निदर्शनास आणून द्यावी व जिल्ह्याचा प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास या ३ दिवसाच्या आत सादर करावा.

अव्वल कारकून व मंडळ अधिकारी हे दोन्ही संवर्ग जिल्हा संवर्ग असून या दोन्ही संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी जिल्हाधिकारी आहेत. परिणामत: जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतीम सेवा ज्येष्ठता सूचीच्या आधारे विभागातील अव्वल कारकून व मंडळ अधिकारी यांची एकत्रित प्रारुप सेवा ज्येष्ठता सूची या सोबत संलग्न केलेल्या परिशिष्टा प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरहू परिशिष्टान्वये प्रसिध्द केलेल्या यादी मध्ये कर्मचाऱ्याचे नांव, नियुक्तीचा प्रवर्ग, पदोन्नतीची तारीख यासारख्या बाबीमध्ये काही चुका झाल्या असल्यास तशा संबधित जिल्हाधिकारी यांचेकडे प्रसिध्दी दिनांकापासून ७ दिवसाच्या आत संबंधीत जिल्हाधिकारी यांचेकडे सादर कराव्यात. संबंधीत जिल्हाधिकारी यांनी प्राप्त निवेदनांची पडताळणीकरुन आपल्या अभिप्राय या कार्यालयाच्या ३ दिवसाच्या आत सादर करावेत.

२..

शासन महसूल व वन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०२०००/ प्र.क्र.१२७/ई-९, दिनांक ०९ ऑक्टोंबर, २००० मधील निर्देशानुसार जिल्हाधिकारी यांचे स्तरावर प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतीम सेवाज्येष्ठता सूचीच्या आधारे प्रसिध्द करण्यात येत असल्यामुळे पुन्हा त्यावर आक्षेप हरकती मागविण्याची आवश्यकता नाही. मात्र एकत्रित सेवा ज्येष्ठता सुची प्रसिध्द करतांना काही वास्तव चुका आढळून आल्यास त्या या कार्यालयास जिल्हाधिकारी यांनी आपल्या अभिप्रायासह ३ दिवसाच्या आत अवगत कराव्यात.

सदरहू एकत्रित विभागाच्या सेवा ज्येष्ठतासूचीच्या अनुषंगाने निदर्शनास आलेल्या चुका जिल्हाधिकारी यांचे मार्फत ७ दिवसाचे आत प्राप्त न झाल्यास तात्पुरती सेवा ज्येष्ठता सुची बरोबर असल्याचे गृहीत धरुन सदरची सेवा ज्येष्ठतासूची अंतिम करण्यात येईल.

(जे.पी.गुप्ता)
विभागीय आयुक्त,
अमरावती

**प्रतिलिपी : माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.**

१) जिल्हाधिकारी, अमरावती / अकोला / यवतमाळ / बुलडाणा /वाशिम.
२) उप आयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.
३) उपविभागीय अधिकारी ------------------------------------(सर्व)
४) तहसीलदार------------------------------------------------(सर्व)
५) निवड नस्ती.